प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
Department of Communication, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022-22660502

वेबसाइट : www.rbi.org.in
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

मे 17, 2019

**बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (एएसीएस) कलम 35 अ खालील निर्देश :- पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील को-ऑपरेटिव बँक लि. नाशिक, महाराष्ट्र - मुदतवाढ**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (एएसीएस) कलम 56 सह वाचित कलम 35 अ च्या पोटकलम (1) खाली देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व्ह बँकेने, जनतेच्या हितासाठी, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील को-ऑपरेटिव बँक लि. नाशिक, महाराष्ट्र ह्यांना, मे 19, 2018 रोजीचा व्यवहार समाप्त झाल्यापासून निर्देश दिले होते. भारतीय रिझर्व्ह बँकेने आता ह्या निर्देशांना, पुनरावलोकनाच्या अटीवर आणखी चार महिन्यांची, म्हणजे मे 19, 2019 ते सप्टेंबर 17, 2019 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. जनतेच्या माहितीसाठी ह्या निर्देशांची एक प्रत वरील बँकेच्या कार्यालयात लावण्यात आली आहे. परिस्थितीवर अवलंबून ह्या निर्देशात बदल करण्याचा विचार भारतीय रिझर्व्ह बँक करु शकते. हे निर्देश देण्यात आले ह्याचा अर्थ, भारतीय रिझर्व्ह बँकेने वरील बँकेचा बँकिंग परवाना रद्द केला आहे असा घेण्यात येऊ नये. वरील बँकेची आर्थिक स्थिती सुधारेपर्यंत, ती बँक, बँक व्यवहार निर्बंधांसह करणे सुरु ठेवू शकते.

**शैलजा सिंग**
उप महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2018-2019/2705**